सकाळ
दि. १७ डिसेंबर २०१०

# शिक्षणापासून वंचितांना 'जनशिक्षण'चा आधार

## उमा प्रभू : स्वयंरोजगारनिर्मितीसाठी प्रयत्न सुरूच

कुडाळ, ता. १६ : जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून अनेक तरुण-तरुणी स्वयंरोजगाराकडे वळून स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करीत आहेत, ही बाब समाधानाची आहे. यापुढेही समाजातील शिक्षणापासून वंचितांसाठी जनशिक्षण संस्थानचे सहकार्य राहील. या उपक्रमाचा लाभ घेऊन तरुणांनी आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सदस्य तथा जनशिक्षण संस्थानच्या जिल्हाध्यक्ष सौ. उमा सुरेश प्रभू यांनी येथे केले.

मनुष्यबळ विकास मंत्रालय पुरस्कृत जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या प्रशिक्षणार्थींची पाठपुरावा बैठक येथील अनंत मुक्ताई मंगल कार्यालयात झाली. या वेळी त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. व्यासपीठावर संचालक एन. डी. केळकर, लुपिन फाऊंडेशनचे व्यवस्थापक योगेश प्रभू, व्यवस्थापकीय समिती सदस्य सौ. यशश्री सौदागर, नवनिर्वाचित संचालक रोहिदास कदम आदी होते. या वेळी सौ. प्रभू म्हणाल्या, "जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गने जिल्ह्यात स्वयंरोजगारविषयक प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना रोजगारविषयक संधी निर्माण करून दिली. येथील महिला व तरुणांनी याचा लाभ घ्यावा."

श्री. केळकर म्हणाले, "गेल्या दहा वर्षांत संस्थेने केलेली प्रगती निश्चित कौतुकास्पद आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काम करताना त्यांना अपेक्षित असलेले कार्य संस्था करीत आहे. अनेक तरुणांनी स्वतःचे सुरू केलेले उद्योग हे या श्रमाचे फलित आहे. संस्था शिक्षणापासून वंचित व तळागाळातील लोकांसाठी काम करीत आहे. त्यांचा सकारात्मक मिळत असलेला प्रतिसाद निश्चितच संस्थेस प्रगतिपथावर नेईल."

या वेळी उपस्थित बँकांच्या प्रतिनिधींनी तरुण-तरुणींना रोजगारविषयक बँकांच्या विविध योजनांची माहिती दिली. पी. एम. निकम यांनी प्रास्ताविक केले. डी. व्ही. परुळेकर यांनी आभार मानले. या वेळी जनशिक्षण संस्थानचे अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.

दैनिक तरुण भारत दि. २६ एप्रिल २०१२

# केवळ प्रशिक्षणच नव्हे, तर पाठपुरावाही

## 'जनशिक्षण'च्या स्वयंरोजगार बैठकीला प्रतिसाद

▶ **कणकवली / प्रतिनिधी**

स्वयंरोजगाराबाबत अनेक प्रशिक्षणे होतात, शासकीय अनुदानावर व्यवसायही सुरू केले जातात. मात्र, अपवाद वगळता अनुदान प्राप्त झाल्यानंतर हे व्यवसाय सुरू आहेत का? याबाबत फारशी खातरजमा होत नाही. मात्र, जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या वतीने स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण दिलेल्या व व्यवसाय सुरू केलेल्या लाभार्थींचा मेळावा अर्थात पाठपुरावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थित प्रशिक्षणार्थी, लाभार्थी, व्यावसायिकांनी लावलेली उपस्थितीच या संस्थानच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमाची यशस्वीता दाखवून गेली.

तत्कालीन केंद्रीयमंत्री सुरेश प्रभू यांच्या प्रयत्नातून केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या माध्यमातून 'जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्ग'चा २००१ मध्ये शुभारंभ झाला. या संस्थानच्या माध्यमातून विविध स्वयंरोजगाराबाबत प्रशिक्षणे देण्यात आली. त्याचा लाभ अनेकांनी घेतला. काहींनी, त्यातून प्रेरणा घेत अनुभवाच्या माध्यमातून व्यवसाय सुरू केले व यशस्वीही केले.

दरम्यान, जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या अध्यक्षा सौ. उमा प्रभू यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील जनशिक्षण संस्थानच्या लाभार्थ्यांची पाठपुरावा बैठक येथील तांबे हॉलमध्ये झाली. बैठकीला संस्थानच्या माध्यमातून प्रशिक्षण घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरू केलेली मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. गेली सुमारे ११ वर्षे संस्थानच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रयत्नांनंतर गरजू लाभार्थ्यांनी याचा लाभ घेऊन स्वत:च्या पायावर उभे राहून स्वयंरोजगार निर्मिती केल्याबद्दल सौ. प्रभू यांनी समाधान व्यक्त केले.

लाभार्थ्यांनीही प्रशिक्षण घेण्यापूर्वीची मानसिकता व प्रशिक्षण घेतल्यानंतर स्वत:च्या पायावर उभे राहिल्यानंतर निर्माण झालेला आत्मविश्वास याबाबत मनोगत व्यक्त केले.

यावेळी सौ. उमा प्रभू, संचालक सौ. सौदागर, रोहिदास कदम, कार्यक्रम अधिकारी राजश्री सामंत, परेश निकम, खादी ग्रामोद्योगचे आर. ए. बुचडे, स्व. सुनील तळेकर ट्रस्टचे नितीन तळेकर, महिला आर्थिक विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी श्री. कांबळे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन जनशिक्षण संस्थानचे दत्तात्रय परुळेकर यांनी केले. आभार सचिन मोहिते यांनी मानले.



**कणकवली** : जनशिक्षण संस्थानच्या लाभार्थी पाठपुरावा बैठकीत बोलताना सौ. सौदागर. बाजूला उमा प्रभू, राजश्री सामंत, रोहिदास कदम, नितीन तळेकर, परेश निकम व अन्य.

मिलिंद निमणकर, कणकवली

तरुण भारत दि. १४ डिसेंबर २०१० सिंधुदुर्ग ८

# युवकांनी आपले भविष्य उज्वल करावे

## 'जनशिक्षण'च्या प्रशिक्षणार्थी बैठकीत उमा प्रभू यांचे आवाहन

▶ कुडाळ / वार्ताहर

जनशिक्षण संस्थान (सिंधुदुर्ग) च्या माध्यमातून अनेक युवक-युवती स्वयंरोजगाराकडे वळून स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही बाब समाधानाची असून यापुढे समाजातील शिक्षणापासून वंचित लोकांसाठी लाभ घेऊन युवकांनी आपले भविष्य उज्वल करावे, असे आवाहन राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सदस्य तथा जनशिक्षण संस्थान (सिंधुदुर्ग) च्या अध्यक्षा सौ. उमा प्रभू यांनी येथे केले.

मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत जनशिक्षण संस्थान, सिंधुदुर्गच्या प्रशिक्षणार्थ्यांची पाठपुरावा बैठक येथील अनंत मुक्ताई मंगल कार्यालयात झाली. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून सौ. प्रभू बोलत होत्या. व्यासपिठावर संचालक एन. डी. केळकर, ल्युपिन फाऊंडेशन संस्थेचे व्यवस्थापक योगेश प्रभू, व्यवस्थापकीय समिती सदस्या सौ. यशश्री सौदागर, नवनिर्वाचित संचालक रोहिदास कदम आदी उपस्थित होते.

सौ. प्रभू म्हणाल्या, जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गने जिल्ह्यात स्वयंरोजगारविषयक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांना रोजगारविषयक संधी निर्माण करून दिली आहे. येथील महिला व युवकांनी याचा लाभ घेऊन त्यांच्या जीवनात झालेला बदल सुखद असून यापुढेही अशा संधीचा लाभ त्यांनी घ्यावा. यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यास संस्था कटिबद्ध आहे, असे अभिवचन त्यांनी दिले.

संस्थेचे संचालक श्री. केळकर म्हणाले, गेल्या दहा वर्षांत संस्थेने केलेली प्रगती निश्चितच स्पृहणीय आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार काम करताना त्यांना अपेक्षित असलेले कार्य संस्था करीत आहे. अनेक युवकांनी स्वत:चे सुरू केलेले उद्योग हे या श्रमाचे फलित आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित बँकांच्या प्रतिनिधींनी युवक-युवतींना रोजगारविषयक बँकांच्या विविध योजनांची माहिती दिली. अनेक उदयोन्मुख स्वयंरोजगारी युवक-युवतींनी आपले रोजगारविषयक अनुभव कथन केले. व्यवसाय उभारणी करताना आलेल्या समस्या व बँकांकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त केल्या.

प्रास्ताविक पी. एम. निकम यांनी, आभार डी. व्ही. परुळेकर यांनी मानले. जनशिक्षण संस्थानचे अधिकारी-कर्मचारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिंधुदुर्ग

पुढारी दि. १२ डिसेंबर २०१०

# जनशिक्षण संस्थानच्या उपक्रमांचा लाभ घ्या : सौ. प्रभू

कुडाळ (शहर वार्ताहर): जन शिक्षणसंस्थानसिंधुदुर्गच्यामाध्यमातून अनेक युवक-युवतीं स्वयंरोजगाराकडे वळून स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करत आहेत ही समाधानाची बाब आहे. शिक्षणापासून वंचित लोकांसाठी जन शिक्षण संस्थानचे नेहमीच सहाकार्य राहील. जन शिक्षण संस्थानच्या विविध उपक्रमांचा लाभ घेवून युवकांनी आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन संस्थेच्या सिंधुदुर्गच्या अध्यक्षा सौ. उमा प्रभू यांनी कुडाळ येथे केले.

जन शिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या प्रशिक्षणार्थींची पाठपुरावां बैठक येथील अनंत मुक्ताई मंगल कार्यालयात झाली. त्यावेळी सौ. प्रभू बोलत होत्या. संचालक एन. डी. केळकर, लुपिन फाऊंडेशन संस्थेचे व्यवस्थापक योगेश प्रभू, व्यवस्थाकीय समिती सदस्या सौ. यशस्वी सौदागर, नवनिर्वाचित संचालक रोहिदास कदम उपस्थित होते.

सौ. प्रभू म्हणाल्या, जन शिक्षण संस्थानने जिल्ह्यात स्वयंरोजगार विषयक प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करून युवक-युवतींना रोजगार विषयक संधी निर्माण करून दिली. येथील महिला व युवकांनी याचा लाभ घेवून त्यांच्या जीवनात झालेला बदल सुखद आहे. यापुढेही अशा संधीचा लाभ त्यांनी घ्यावा. यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यास संस्था कटिबध्द आहे असे अभिवचन त्यांनी यावेळी दिले.

संचालक एन. डी. केळकर म्हणाले, गेल्या दहा वर्षात संस्थेने केलेली प्रगती निश्चितच स्पृहनीय आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार काम करताना त्यांना अपेक्षित असलेले कार्य संस्था करत असून अनेक युवकांनी स्वतःचे सुरू केलेले उदयोग हे या श्रमाचे फलित आहे असे सांगितले. यावेळी उपस्थित बँकांच्या प्रतिनिधींनी युवक-युवतींना रोजगार विषयक बँकाच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रास्ताविक पी. एम. निकम यांनी केले तर डी. व्ही. परूळेकर यांनी आभार मानले.

# युवकांनी आपले भविष्य उज्वल करावे

## 'जनशिक्षण'च्या प्रशिक्षणार्थी बैठकीत उमा प्रभू यांचे आवाहन

▶ कुडाळ / वार्ताहर

जनशिक्षण संस्थान (सिंधुदुर्ग) च्या माध्यमातून अनेक युवक-युवती स्वयंरोजगाराकडे वळून स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही बाब समाधानाची असून यापुढे समाजातील शिक्षणापासून वंचित लोकांसाठी लाभ घेऊन युवकांनी आपले भविष्य उज्वल करावे, असे आवाहन राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सदस्य तथा जनशिक्षण संस्थान (सिंधुदुर्ग) च्या अध्यक्षा सौ. उमा प्रभू यांनी येथे केले.

मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत जनशिक्षण संस्थान, सिंधुदुर्गच्या प्रशिक्षणार्थ्यांची पाठपुरावा बैठक येथील अनंत मुक्ताई मंगल कार्यालयात झाली. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून सौ. प्रभू बोलत होत्या. व्यासपिठावर संचालक एन. डी. केळकर, ल्युपिन फाऊंडेशन संस्थेचे व्यवस्थापक योगेश प्रभू, व्यवस्थापकीय समिती सदस्या सौ. यशश्री सौदागर, नवनिर्वाचित संचालक रोहिदास कदम आदी उपस्थित होते.

सौ. प्रभू म्हणाल्या, जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गने जिल्ह्यात स्वयंरोजगारविषयक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांना रोजगारविषयक संधी निर्माण करून दिली आहे. येथील महिला व युवकांनी याचा लाभ घेऊन त्यांच्या जीवनात झालेला बदल सुखद असून यापुढेही अशा संधीचा लाभ त्यांनी घ्यावा. यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यास संस्था कटिबद्ध आहे, असे अभिवचन त्यांनी दिले.

संस्थेचे संचालक श्री. केळकर म्हणाले, गेल्या दहा वर्षांत संस्थेने केलेली प्रगती निश्चितच स्पृहणीय आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार काम करताना त्यांना अपेक्षित असलेले कार्य संस्था करीत आहे. अनेक युवकांनी स्वत:चे सुरू केलेले उद्योग हे या श्रमाचे फलित आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित बँकांच्या प्रतिनिधींनी युवक-युवतींना रोजगारविषयक बँकांच्या विविध योजनांची माहिती दिली. अनेक उदयोन्मुख स्वयंरोजगारी युवक-युवतींनी आपले रोजगारविषयक अनुभव कथन केले. व्यवसाय उभारणी करताना आलेल्या समस्या व बँकांकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त केल्या.

प्रास्ताविक पी. एम. निकम यांनी, आभार डी. व्ही. परुळेकर यांनी मानले. जनशिक्षण संस्थानचे अधिकारी-कर्मचारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ : कोल्हापूर
बुधवार, ११ नोव्हेंबर २००९

# ‘जनशिक्षण’चे संकेतस्थळ बनविणार

## उमा प्रभू : बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न

सकाळ वृत्तसेवा



**सावंतवाडी :** जनशिक्षण संस्थेच्या वतीने येथील श्रीराम वाचन मंदिरात मंगळवारी आयोजित लाभार्थी मेळाव्याचे उद्‌घाटन करताना सौ. उमा प्रभू. शेजारी योगेश प्रभू, श्री. केळकर आदी.

सावंतवाडी, ता. १० : जनशिक्षणच्या माध्यमातून स्वयंरोजगार उपलब्ध झालेल्यांच्या मालाला जागतिक बाजारपेठ खुली करण्यासाठी जनशिक्षण समितीचे संकेतस्थळ बनविण्यात येणार असल्याचे संस्थेच्या अध्यक्ष उमा सुरेश प्रभू यांनी आज येथे आयोजित कार्यक्रमात स्पष्ट केले.

जनशिक्षण संस्थेच्या वतीने प्रशिक्षण देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचा पाठपुरावा मेळावा आज येथे श्रीराम वाचन मंदिरामध्ये झाला. या वेळी अध्यक्षस्थानावरून सौ. प्रभू बोलत होत्या. व्यासपीठावर योगेश प्रभू, संस्थेचे संचालक एन. जी. केळकर आदी होते. या वेळी लाभार्थ्यांना शासनाच्या तसेच अन्य विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले. सौ. प्रभू म्हणाल्या, ‘‘जनशिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विविध लाभार्थ्यांनी बनविलेल्या वस्तूंना मोठ्या प्रमाणात मागणी आहे; परंतु या वस्तू ग्राहकापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक बाजारपेठ आपल्याकडे नाही. त्यामुळे अद्याप संस्थेचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही. संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या बेरोजगार युवक-युवतींना आपल्या पायावर उभे राहण्याची संधी मिळावी, यासाठी संस्थेने जबाबदारी पेलावी. या बाजारपेठेला देशाबरोबर जगातही मागणी मिळण्यासाठी आता संस्था आपले स्वतःचे [illegible]स्थळ निर्माण करणार आहे. यासाठी संस्थेत प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपली संपूर्ण माहिती आपण करीत असलेला व्यवसाय, उत्पादित वस्तू आदींची इत्थंभुत माहिती संस्थेकडे द्यावी. जेणेकरून संबंधितांच्या अंगात असलेल्या कलेला वाव देता येईल.’’

ल्युपिन फाऊंडेशनचे योगेश प्रभू म्हणाले, ‘‘संस्थेने नेहमीच्या अभ्यासक्रमाबरोबरच नर्सिंग, पॅरामेडिकल, रक्त तपासणी आदी अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्या माध्यमातून युवकांना आपोआप रोजगार मिळेल. [illegible]कांची मागणी पाहून रोजगार स्वीका[illegible]स बेरोजगार म्हणण्याची वेळ येणार नाही.’’

श्री. केळकर म्हणाले, ‘‘जनशिक्षणच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आधार घेत येथील युवकांनी आपला आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी प्रयत्न करावा.’’ या वेळी जनशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणारे लाभार्थी उपस्थित होते.

रविवार दि. १५ नोव्हेंबर २००९ S
तरुण भारत





सावंतवाडी : जनशिक्षण संस्था आयोजित लाभार्थी मेळाव्यात व्यासपीठावर सौ. उमा प्रभू, एन. डी. केळकर, एस. के. भाईप, यू. एम. जाधव, योगेश प्रभू आदी. तर समोर उपस्थित लाभार्थी.

अनिल भिसे, सावंतवाडी

# स्वयंरोजगारातून युवकांनी उन्नती साधावी!

▶ सावंतवाडी / प्रतिनिधी

स्वयंरोजगाराच्या माध्यमातून युवक-युवतींनी आपली उन्नती साधावी. स्वयंरोजगार उभारणीसाठी शासनाकडून विविध कर्ज उपलब्ध होतात. त्याचा लाभ युवक-युवतींनी घ्यावा. जनशिक्षण संस्थेतर्फे सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही या संस्थेच्या अध्यक्षा तथा माजी केंद्रीयमंत्री सुरेश प्रभू यांच्या पत्नी सौ. उमा प्रभू यांनी येथे दिली.

येथील श्रीराम वाचन मंदिरात मंगळवारी या संस्थेतर्फे लाभार्थींचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे संचालक एन. डी. केळकर, बँक ऑफ इंडियाचे राजन नाईक, खादी ग्रामोद्योगचे एस. के. भाईप, आयडीएलचे यु. एम. जाधव आदी उपस्थित होते.

सौ. प्रभू पुढे म्हणाल्या, जनशिक्षण संस्थेतर्फे विविध उद्योगाचे प्रशिक्षण देण्यात येते. उद्योग उभारणीसाठी आवश्यक सहकार्य या संस्थेमार्फत केले [illegible] युवक-युवतींनी स्वयंरोजगार उभारून स्वत:ची आर्थिक उन्नती साधावी, यासाठी संस्थेचा प्रयत्न असतो. स्वयंरोजगारासाठी युवक-युवतींना सर्वोतोपरी मदत देण्यात येईल. यापुढे संस्थेची वेबसाईट उघडण्यात येईल. या वेबसाईटवर सर्व माहिती मिळू शकेल. राजन नाईक यांनी बँक कर्जाविषयी माहिती दिली. यु. एम. जाधव यांनी प्रकल्प अहवालाविषयी मार्गदर्शन केले.

त्यांनी उद्योग उभारण्यासाठी [illegible]कारात्मक दृष्टिकोनाची गरज व्यक्त केली. [illegible]ळी प्रशिक्षणार्थींनी विचार मांडले. फुकेरी येथील सीमा गावडे, अश्विनी गावडे, वर्षा गावडे, वासंती गावडे, दर्शना गावडे यांनी आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे पाचवीतून शिक्षण सोडले होते. मात्र जनशिक्षण संस्थेमुळे आम्हाला आता पुढील शिक्षण घेणे शक्य झाले. आम्ही शिक्षण घेऊन जीवनात प्रगती करू. संस्थेमुळे आम्हाला पुढील शिक्षणाची कवाडे खुली झाली, असे मत या विद्यार्थीनींनी व्यक्त केले. यावेळी जनशिक्षण संस्थेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'जनशिक्षण'तर्फे विविध प्रशिक्षण वर्ग

▶ सावंतवाडी / प्रतिनिधी

भारत सरकार पुरस्कृत जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गतर्फे सावंतवाडी येथे १ जुलैपासून विविध व्यावसायिक, तांत्रिक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. वेल्डींग फेब्रिकेशन, शिल्ट मेटल वर्क, इलेक्ट्रीशियन वायरमन, डिझेल मॅकेनिक, टु व्हीलर दुरुस्ती, सौंदर्यसाधना, कॅटरिंग, बेकरी उत्पादने, सॉफ्ट टॉईज, फॅन्सी बॅग्जु, कृत्रिम दागिने बनविणे, भरत काम आदी कोर्सेस आयोजित केले आहेत. प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. अधिक माहितीसाठी ०२३६२-२२३६६७ किंवा सौ. अनुराधा महाजन, सावंतवाडी यांच्याकडे संपर्क साधावा.

रत्नागिरी टाइम्स
दि. ११ नोव्हेंबर २००९




जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या पाठपुरावा बैठकीत उपस्थित अध्यक्षा सौ. उमा प्रभू, प्रा.यु.एम. जाधव, श्री.भाईप, डॉ. गिरसागर व इतर. (छाया-योगिता जोशी, सावंतवाडी)

# प्रशिक्षण, संशोधन व मार्केटिंगच्या माध्यमातून जनशिक्षण संस्था निश्चितपणे पुढे जाईल: उमा प्रभू

सावंतवाडी, १० नोव्हेंबर (वार्ताहर)-प्रशिक्षण, संशोधन आणि मार्केटिंग या तीन माध्यमातून जनशिक्षण संस्था पुढे जाणार असुन बेरोजगार तरुण-तरुणींना स्वतःचा व्यवसाय उभा करण्यास सर्वतोपरी सहकार्य केले जाईल अशी माहिती जनशिक्षण संस्थानच्या अध्यक्षा सौ. उमा प्रभु यांनी येथे दिली.

जनशिक्षण संस्थान, सिंधुदुर्गच्या पाठपुरावा बैठकीत त्या बोलत होत्या. सदर बैठक श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडीच्या सभागृहात संपन्न झाली. सौ.प्रभू पुढे बोलताना म्हणाल्या, तुमच्या भागात जो कच्चा माल सहज उपलब्ध होत असेल त्याची माहिती आम्हाला दिल्यास त्या मालावर आधारित कोणते उद्योग करता येईल याचे संशोधन करुन प्रशिक्षण कोणते द्यावे याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. तसेच जनशिक्षण संस्था तळागाळापर्यंत पोहोचवून लोकाभिमुख होऊ द्या असे आवाहन केले.

तसेच त्यांनी पुढे असे सांगितले की, यापुढे दिली जाणारे प्रशिक्षण हे तीन टप्प्यांचे असणार आहेत. प्रथम प्रशिक्षण, त्यानंतर त्यावर संशोधन करुन, मार्केटिंग बाबतची सविस्तर माहिती संबंधितांना देण्यात येणार आहे.

यावेळी बँक ऑफ इंडिया, शाखा सावंतवाडीचे राजन नाईक यांनी लघु उद्योग व बँकिंग सुविधेबाबत माहिती दिली. मालवण ममरा ज्युनि.कॉलेजचे कुडाळचे प्रतिनिधी श्री.भाईप, जनशिक्षण संस्थानचे ट्रस्टी डॉ.श्रीपाद गिरसागर, लुपिन फाउंडेशनचे प्रकल्प संचालक योगेश प्रभु यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. या पाठपुरावा बैठकीला सावंतवाडी, दोडामार्ग व वेंगुर्ला या तिन्ही तालुक्यातील जनशिक्षण संस्थान कडून प्रशिक्षण घेऊन आज स्वतःचा व्यवसाय सुरु करुन उद्योजक बनलेले सुमारे १५० व्यावसायिक उपस्थित होते. या सर्व प्रशिक्षणार्थींनी काथ्यापासून दोरी बनविणे, अगरबत्ती, मेणबत्ती, साबण पावडर बनविणे, नर्सिंग सहाय्यक, कृत्रिम दागिने बनविणे, वेल्डिंग फॅब्रीकेशन, इलेक्ट्रिशियन वायरमन, शिवणकला, सौंदर्य साधना, फळप्रक्रिया नैसर्गिक धान्यापासून वस्तु बनविणे आदी प्रशिक्षण देण्यात आले होते. या प्रशिक्षणाच्या आधारावर त्यांनी स्वतःचे उद्योग सुरु केले आहेत.

रत्नागिरी टाइम्स
दि. ११ नोव्हेंबर २००९




जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या पाठपुरावा बैठकीत उपस्थित अध्यक्षा सौ. उमा प्रभू, प्रा.यु.एम. जाधव, श्री.भाईप, डॉ. गिरसागर व इतर. (छाया-योगिता जोशी, सावंतवाडी)

# प्रशिक्षण, संशोधन व मार्केटिंगच्या माध्यमातून जनशिक्षण संस्था निश्चितपणे पुढे जाईल: उमा प्रभू

सावंतवाडी, १० नोव्हेंबर (वार्ताहर)-प्रशिक्षण, संशोधन आणि मार्केटिंग या तीन माध्यमातून जनशिक्षण संस्था पुढे जाणार असुन बेरोजगार तरुण-तरुणींना स्वतःचा व्यवसाय उभा करण्यास सर्वतोपरी सहकार्य केले जाईल अशी माहिती जनशिक्षण संस्थानच्या अध्यक्षा सौ. उमा प्रभु यांनी येथे दिली.

जनशिक्षण संस्थान, सिंधुदुर्गच्या पाठपुरावा बैठकीत त्या बोलत होत्या. सदर बैठक श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडीच्या सभागृहात संपन्न झाली. सौ.प्रभू पुढे बोलताना म्हणाल्या, तुमच्या भागात जो कच्चा माल सहज उपलब्ध होत असेल त्याची माहिती आम्हाला दिल्यास त्या मालावर आधारित कोणते उद्योग करता येईल याचे संशोधन करुन प्रशिक्षण कोणते द्यावे याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. तसेच जनशिक्षण संस्था तळागाळापर्यंत पोहोचवून लोकाभिमुख होऊ द्या असे आवाहन केले.

तसेच त्यांनी पुढे असे सांगितले की, यापुढे दिली जाणारे प्रशिक्षण हे तीन टप्प्यांचे असणार आहेत. प्रथम प्रशिक्षण, त्यानंतर त्यावर संशोधन करुन, मार्केटिंग बाबतची सविस्तर माहिती संबंधितांना देण्यात येणार आहे.

यावेळी बँक ऑफ इंडिया, शाखा सावंतवाडीचे राजन नाईक यांनी लघु उद्योग व बँकिंग सुविधेबाबत माहिती दिली. मालवण मसुरा ज्युनि.कॉलेजचे प्राचार्य यु.एम.जाधव यांनी विविध प्रशिक्षणांवरील प्रोजेक्ट रिपोर्ट संदर्भात मार्गदर्शन केले. खादी ग्रामोद्योग कुडाळचे प्रतिनिधी श्री.भाईप, जनशिक्षण संस्थानचे ट्रस्टी डॉ.श्रीपाद गिरसागर, लुपिन फाउंडेशनचे प्रकल्प संचालक योगेश प्रभु यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. या पाठपुरावा बैठकीला सावंतवाडी, दोडामार्ग व वेंगुर्ला या तिन्ही तालुक्यातील जनशिक्षण संस्थान कडून प्रशिक्षण घेऊन आज स्वतःचा व्यवसाय सुरु करुन उद्योजक बनलेले सुमारे १५० व्यावसायिक उपस्थित होते. या सर्व प्रशिक्षणार्थींनी काथ्यापासून दोरी बनविणे, अगरबत्ती, मेणबत्ती, साबण पावडर बनविणे, नर्सिंग सहाय्यक, कृत्रिम दागिने बनविणे, वेल्डिंग फॅब्रीकेशन, इलेक्ट्रिशियन वायरमन, शिवणकला, सौंदर्य साधना, फळप्रक्रिया नैसर्गिक धान्यापासून वस्तु बनविणे आदी प्रशिक्षण देण्यात आले होते. या प्रशिक्षणांच्या आधारावर त्यांनी स्वतःचे उद्योग सुरु केले आहेत.